ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

# ‘मनेरेगा योजनेचे महत्व व सद्यस्थिती’

**प्रा.विजयकुमार सुरद्र विनोदकर**
बाबासाहेब चितळे महाविद्यालय
भिलवडी, जि.सांगली

## प्रस्तावना

भारतीय अथ व समाज व्यवस्थेत राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या विचारला खूप महत्वाचे स्थान आहे. गांधीजी हे अथशास्त्राचे विध्यार्थी किंवा अर्थशास्त्राचे विद्वान अभ्यासकही नव्हते. पण त्यांनी मांडलेले विचार अथव्यवस्थेला दिशा देणारे आहेत. उदा.अहिंसा, सत्य, सर्वोदय, विश्वस्थ, खेड्याकडे चला, खादीग्रामोद्योग, न्याय, स्वातंत्र्य, समता, व स्वदेशी यामध्ये अथशास्त्र दडलेले आहे. अथशास्त्रातसुद्धा मानवी मनाचा, मानवाच्या कल्याणाचा, राहणीमान, जीवनमान व उपभोगातून मिळणाऱ्या समाधानाचा विचार केला जातो. गांधीजीनी मानवाच्या श्रमाच्या, शरीराला, मनाला व बुद्दीला प्रतिष्टा मिळवून देण्याचे महत्वाचे काय केले आहे. ज्याप्रमाणे पैशाला दोन बाजू आहेत त्याप्रमाणे त्याच्या कायाला दोन बाजू आहेत.

१. सामाजिक बाजू
२. आथिक बाजू

प्रसिद्ध अथतज्ञ अँडम स्मिथ, कलाक माक्स यांनी मानवाच्या श्रमाला अधिक महत्व दिले आहे. स्मिथने तर सव संपतीचा निमाता तर श्रमिकच आहे असे म्हंटले आहे. क्लाक माक्स म्हणतात माणूस हा कता आहे. कामातुनच त्याचे व्यक्तिमत्व घडत असते. समाज व संस्कृतिची बांधणी करित असतो. महात्मा गांधी याही पुढे जाऊन म्हणतात की, माणसाला प्राप्त झालेले शरीर म्हणजे एक अदभूत यंत्र आहे. मन आणि बुद्धी व शरीर हे त्याचे पाटस आहेत. गांधीजीनी खादीग्रामोद्योगाचे अथशास्त्र मांडलेले आहे. शिक्षण, स्वावलंबन व स्वदेशी याचा त्यांनी पुरस्कार केला आहे.

## मनेरेगा योजनेची पार्श्वभूमी

महाराष्ट्रात जेंव्हा १९७२ ला भीषण दुष्काळ पडला होता. त्यावेळी रोजगार हमी योजनेचे शिल्पकार वि.स.पागे यांनी दुष्काळासारख्या गंभीर समस्येला तोंड देण्यासाठी लोकांना आधार देण्यासाठी त्यांची क्रयशक्ती वाढविण्यासाठी रोजगार हमी योजना संकल्पना महाराष्ट्रात अवलंबली. वि.स.पागे यांनी १९६५ मध्ये हि संकल्पना मांडली होती. प्रत्यक्ष महाराष्ट्र सरकारने १९७७-७८ ला कायद्यानेच या योजनेअंतगत महाराष्ट्रातील जनतेला रोजगाराची हमी देण्यात आली. रोजगार हमी योजनेची संकल्पना राबविणारे देशातील पहिले राज्य म्हणजे महाराष्ट्र होय.

भारताचा विचार केल्यास सन २००५ ला संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारने महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना सुरु केली. सुरवातीला हि योजना देशातील २०० जिल्ह्यात लागू करण्यात आली. पुन्हा १३० जिल्ह्यासाठी हि योजना सुरु केली. देशातील अकुशल लोकांना, गरीब, दुबल, असंघटीत लोकांना रोजगार उपलब्ध करून देणे. समाजातील दुख, दारिद्र्य, बेकारी, विषमता कमी करणे हा या योजनेचा हेतू आहे.

## शोधनिबंध अभ्यासाची उद्दिष्टे

१. मनरेगा योजनेच्या पार्श्वभूमीचा वस्तुनिष्ट पद्धतीने अभ्यास करणे
२. मनरेगा योजनेची व्याप्ती व विस्ताराचा अभ्यास करणे
३. मनरेगा योजनेतील तरतुदीचा लाभ सवसामान्य लोकांना झाला आहे किंवा नाही याचा अभ्यास करणे.
४. मनरेगा योजनेच्या सद्यस्थितीचा अभ्यास करणे.

## अभ्यासाची गुहीतके

१. या योजनेच्या लोकांना निवाह वेतन पातळीपेक्षा अधिक वेतन मिळते.
२. शासन पातळीवर हि योजना प्रामाणिकपणे व पारदर्शीपने राबवली जाते.
३. ग्रामीण भागातही लोकांची आथिक परिस्थिती सुधारली आहे.

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

**अभ्यास पद्धती**

मनरेगा योजनेचा अभ्यास करित असताना प्राथमिक साधनसामग्रीचा वापर केला आहे. यामध्ये शासकीय कार्यालयास भेट देऊन संबधित अधिकारी वर्गाशी चर्चा केली आहे. दुय्यम साधासामुग्रीचा वापर दै.सकाळ, पुढारी, जानप्रवास यातील माहितीचा आधार घेतला आहे. तसेच संदर्भ पुस्तके, मासिके, तज्ज्ञाच्या अभ्यासपूर्ण विविध लेखांचा अभ्यास करून वस्तुनिष्ट मांडणी करण्याचा प्रयत्न केला आहे.

**महाराष्ट्र शासन व केंद्र शासन यांच्या योजनेतील साम्य व भेद**

रोजगार हमी योजना सर्वात प्रथम महाराष्ट्र सरकारने १९७२ ला राबविली आहे. १९७७-७८ मध्ये कायदा पारित करून जि व्यक्ती सदृढ आहे, ज्या व्यक्तीने अर्ज करून कामाची मागणी केली आहे. अशा व्यक्तीला अर्ज केल्यापासून १५ दिवसाच्या आत रोजगार हमी योजेनेअंतर्गत काम देणे बंधनकारक आहे. सरकार अशा व्यक्तिस काम देण्यास असमर्थ असेल तर त्याला बेकार भत्ता दिला जातो.

अशा प्रकारची तरतूद महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेत आहे. यामध्ये हि कामाची मागणी अर्ज करून काम दिले जाते. न दिल्यास त्याला बेकार भत्ता देण्याची तरतूद कायद्यात आहे.

भेदाचा विचार केल्यास

१. मनरेगा मध्ये कुटुंबातील एकाच व्यक्तीस काम देले जाते.पण महाराष्ट्रातील रोजगार हमी योजनेत सर्वांना काम दिले जाते.
२. मनरेगामध्ये एका व्यक्तीस १०० दिवस कामाची तरतूद आहे तर रोजगार हमी योजनेत वर्षभर काम देण्याची तरतूद आहे. मनरेगापेक्षा महाराष्ट्रातील रोजगार हमी योजना सरस आहे.

**मनरेगा योजनेची वैशिष्टे**

मनरेगा हि कल्याणकारी योजना आहे. ग्रामीण भागातील अकुशल, दारिद्र्य रेषेखाली जीवन जगणाऱ्या लोकांना रोजगार मिळवून देण्यसाठी, विषमता नष्ट  करण्यासाठी, परस्परांत सहकार्य निर्माण करण्यसाठी व लोकांच्यात एकात्मता निर्माण करण्यासाठी या योजनेला खूप महत्व आहे.

१. या योजनेत कुटुंबातील एका व्यक्तीस किमान १०० दिवस अकुशल स्वरूपाचे काम देले जाते.
२. काम मागणाऱ्या व्यक्तीस १५ दिवसाच्या आत काम देण्याची तरतूद आहे.
३. सरकार काम देण्यास असमर्थ असेल तर त्याला बेकार भत्ता दिला जातो.
४. रोजगाराला उदरनिर्वाहासाठी दररोज ६० रु. हजेरी दिली जाते.
५. मजुरावर खर्च करण्याची सर्व जबाबदारी केंद्र सरकारची असते
६. रोजगाराला गावात किवा गावापासून ५ किमी अंतरावर काम दिले जाते.
७. कामाच्या ठिकाणी पाण्याची, विश्रांतीची व पाळणाघराची सोय केली जाते.

**केंद्रसरकारने आखलेल्या योजना(१९९९ ते २००७)**

केंद्रसरकारने लोकांच्या कल्याणासाठी विविध योजना आखून बेकारी, विषमता व दारिद्र्य कमी करण्याचा प्रयत्न केला आहे.

**तक्ता क्र.१.१**

| क्र. | योजनेचे नाव | वर्ष | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १९९९-०० | २०००-०१ | २००१-०२ | २००२-०३ | २००३-०४ | २००४-०५ | २००५-०६ | २००६-०७ |
| १ | सुवर्णजयंती रोजगार योजना | १३.१ | ४.२ | ४.५ | ४.३ | ४.६ | ६.५ | ४.२ | ४.२ |
| २ | संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना | २३.३ | १५.१ | ३२.२ | ५६.९ | ६२.१ | ३३.१ | ३५.८ | ११.२ |
| ३ | राष्ट्रीय अन्नकाम रोजगार योजना | २८.२ | ६४.४ | ७.५ | ५.७ | ०.० | १३.१. | १९ | ०.० |
| ४ | राष्ट्रीय रोजगार हमी योजना | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ४२ |
| ५ | इतर खर्च | ३५.४ | ६४.४ | ३५.७ | ३३.१ | ३३.२ | ४७.४ | ४१ | ४२ |
| ६ | एकूण खर्च | १०० | १०० | १०० | १०० | १०० | १०० | १०० | १०० |

संदर्भ : अर्थसंवाद जून २००७, खंड ३१ अंक १ पान ८५

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

वरील योजनेचा विचार केल्यास योजना वेगवेगळ्या आहेत पण उद्देश मात्र लोकांना रोजगार उपलब्ध करून देणे, दारिद्र्य व विषमता कमी करणे हा होता.

**महात्मा गांधीजींचे रोजगार विषयक विचार**

प्रसिद्ध शास्त्रज्ञ, नोबेल पुरस्कार विजेता अल्बर्ट आईन्स्टाईन म्हणाले होते की- गांधीजीसारखा एक हाडामांसाचा माणूस भारतात होऊन गेला आहे. याच्यावर माझा विश्वास बसत नाही. गांधीजीना भारतातील समस्यांची जाणीव होती. म्हणूनच त्यांनी , सर्वोदय, विश्वस्थ, खेड्याकडे चला, खादीग्रामोद्योग या संकल्पना जाणीवपूर्वक मांडल्या. त्यांच्या मते- श्रम हे साठविता येत नाही. श्रमशक्ती म्हणजे समाजातील बोझा नसून प्रगतीचे व समृद्धी प्राप्त करून घेण्याचे एक उत्तम साधन आहे. श्रमाला मोबदला व प्रतिष्ठा मिळायला पाहिजे असे त्यांचे मत होते.

गांधीजींचा यंत्राला विरोध नव्हता पण यंत्राचा मर्यादित वापर झाला पाहिजे असे त्यांचे मत होते. माणूस यंत्राचा गुलाम बनता कामा नये. उत्पादन नफ्यासाठी न करता समाज्याच्या कल्याणासाठी करावा. ग्रामस्वराज्य व स्वावलंबन हे गांधीजीच्या विचाराची मध्यवर्ती कल्पना होती. त्यांच्या मते “भिक मागून किंवा भूतदयेच्या आधारे कुणालाही पोटभरून घेण्याची वेळ येऊ नये” खेड्यात व शहरात संतुलन असले पाहिजे. “बेकारी, तांत्रिक सुशिक्षित बेकारी, घर्षणात्मक बेकारी इ. प्रकार आढळतात. यामुळे दारिद्र्य व विषमता निर्माण होत असते. या विचारावरून गांधीजींना अर्थशास्त्रातील अर्थ व कल्याणाची जाणीव होती हे समजते.

**मनरेगा योजनेतील कामाचे स्वरूप**

मनरेगा योजना हि देशातील सीमांत शेतकरी, शेतमजूर, अल्प भू-धारक, कामगार, असंघटीत शेत्रातील सदृढ पण गोर गरीब लोकांच्यासाठी जाणीवपूर्वक शासनाने आखलेली कल्याणकारी योजना आहे. यामध्ये भांडवलप्रधान उत्पादन तंत्राऐवजी श्रमप्रधान उत्पादन तंत्राचा वापर अधिक करावा हि अपेक्षा यामध्ये खालील कामांचा समावेश होतो.

शेततळ्यांची कामे मजुराकडून करून घेणे. सिमट नाला बांधणे, कंपाटमट बायडिंग, विहीर काढून घेण. तळ्यातील गाळ काढून घेणे,दगडीनाला बांधणे, रस्ते दुरुस्ती करणे, रस्त्याच्या दुतर्फा झाडे लावणे, गांडूळखत निर्मिती करणे, वृक्षारोपण करणे, गटार बांधणे, रस्त्यची साईड पट्टी भरणे. केच ऑटर ड्रेन, काटेरी झुडपे काढणे, नाला खोलीकरण करणे, जालरेषा, फायर, शौचालय बांधकाम करणे, नवीन विहिरी बांधणे इ. कामे करून घ्यावीत. हि अपेक्षा आहे. खासदार अमोल महाडिक यांनी पार्लमेंटमध्ये असे मत मांडले आहे की, साखर कारखान्याअंतर्गत होणारी उसतोड हि मनरेगा योजनेअंतर्गत व्हावीत, तसेच नैसर्गिक आपत्तीचे कागदेसुद्धे मनरेगा योजनेअंतर्गत व्हावीत. असे केल्यास लोकांना काम मिळेल, ज्यास्त दिवस काम मिळेल. सामाजिक विषमता कमी करण्यास मदत होईल.

**मनरेगा योजनेची सद्यस्थिती**

कोणतीही योजना किती चांगली आहे. यापेक्षा ती योजना किती प्रामाणिकपणे व काळजीपूर्वक कशी राबविली जाते याला जास्त महत्व आहे. सांगली जिल्हयात राबवीत असलेल्या मनरेगा योजनेचा आढावा घेतल्यास वस्तूस्थिती लक्षात येते. जिल्ह्यातील मिरज तालुका व कडेगाव तालुका यांचा अभ्यास केला आहे. येथे राबविण्यात आलेली मनरेगा योजना म्हणे भ्रष्ट शासकीय कर्मचारी व अधिकाऱ्यांनी भ्रष्टाचाराचे कारण बनविले आहे. स्वयंघोषित पुढारी. ठेकेदार, तहसील, पंचायत समितीतील कर्मचारी यांच्यात साटेलोटे आहे. कडेगाव तालुक्यात वर्षापासून कामे अपूर्ण आहेत. वर्षात कडेगाव तालुक्यात सतत पाऊस असल्यने कामे पडिंग आहेत. असा बनाव केला जात आहे. हि योजना तहसील कार्यालय व पंचायत समिती कार्यालयामार्फत चालविले जात आहेत. या योजनेत कार्यक्रम अधिकारी म्हणून तहसीलदार इ सहाय्यक म्हणून बी.डी.ओ. काम पाहतात. तहसील कार्यलयातील दोन व पंचायत समितीमधील चार कंत्राटदार हे यांचे काम पाहतात, यांच्या मर्जीवर या कामाचे भवितव्य अवलंबून आहे. हे लोक एकमेका सहाय्य करू अवघे धरू सुपंथ” या तत्वाऐवजी “एकमेका सहाय्य करू आपल्यामध्येच सर्व वाटून घेवू” हि संकल्पना राबवीत आहेत. आश्चर्य म्हणजे मनरेगा योजनेतील कामगार यादीत राजकीय नेते व पुढाकाऱ्याची नावे आहेत. कॉलेजमधील मुला, मुलीची नावे आहेत. अधिकारी, कंत्राटदार श्रमिकांनकडून काम करून य घेता जे.सी.बी.यंत्राचा वापर करून कामे करून घेतात व खोटी बिले लाऊन भरपूर पैसा मिळवितात. त्यामुळे मनरेगाचे मूळ उद्दिष्ट साध्य होत नाही. रस्त्यावर

लावण्यासाठी आणलेली झाडे कर्मचारी व अधिकारी यांच्या अंगणात दिसून येतात. हि योजना म्हणजे “झाकली मुठ सव्वालाखाची” अशीच आहे.

मिरज तालुक्यात यापेक्षा वेगळी स्थिती नाही. येथील मनरेगा योजना शासकीय लोकांच्या टक्केवारीत अडकलेले आहे. विहीर काढण्याच्या कामासाठी व जनावराच्या गोट्यासाठी गरीब लोकांकडून टक्केवारी घेतली जाते. १००० ते ५००० रु. वरकमाई केली जाते. सामान्य लोक उसनवारी करून काम करित आहेत. दलाल, ठेकेदार, शासकीय कर्मचारी रोज तुपाशी आहेत. तर सर्वसामान्य मजूर कष्ट करूनसुद्धा उपाशी आहेत.

शासकीय लोकांना गॉडफादर असल्यने कशाचीही भीती वाटत नाही. फार फार तर बादलीच होईल. पलीकडे काही होत नाही माहित आहे.

मनरेगा योजनेला भारतात सर्व ठिकाणी समतोल यश मिळाले नाही. उदा. महाराष्ट्रात केरळमध्ये गोवा या राज्यात योजना लोकप्रिय झाली आहे.पण इतर राज्यात याची दयनीय अवस्था आहे.
उदा. महाराष्ट्रात ८७ लोकांना १०० दिवस काम मिळाले आहे. अन्य राज्यात ८३ लोकांपैकी फक्त ८ लोकांनाच काम मिळाले आहे. २०११ ला मनरेगा योजनेसाठी ४० कोटी रु. मंजूर करून घेतले आहेत पण खर्चमात्र ३३ कोटी केला आहे.

**योजनेचे परिणाम / दोष**

हि योजना चांगली असली तरीसुद्धा योजना राबविणारे लोक/ अधिकारी चांगले नसल्यने समाजावर याचा वाईट परिणाम होत आहे. उदा.

१. या योजनेचा फायदा गरिबांना होण्याऐवजी ठेकेदार इ. मध्यस्थाना अधिक होत आहे.
२. बेकारी कमी होत आहे पण विषमता वाढली आहे.
३. भ्रष्टाचाराचे प्रमाण वाढले आहे.
४. दारिद्रयामुळे आत्महत्येचे प्रमाण वाढत आहे.
५. हि योजना तळागाळापयत पोहचली नाही.

**उपाय / सूचना**

१. हि योजना प्रामाणिकपणे व पारदर्शीपणे राबविली पाहिजे
२. मजुरांना ठेकेदारामार्फत वेतन न देता ई पेमट करावे
३. खासगी क्षेत्रातील मजुरीपेक्षा जास्त वेतन शासनाने द्यावे.
४. १०० दिवसांपेक्षा जास्त काम द्यावे.
५. कुटुंबातील एका व्यक्तीस काम न देता सवाना काम द्यावे.
६. योजना लाभदायक ठरण्यासाठी निरीक्षक नेमावा.
७. मागास भागाकडे या योजनेच्या माध्यमातून अधिक लक्ष्य द्यावे.

**संदभसूची**

१. ग्रामपंचायत, तहसील कार्यालय प्रत्यक्ष भेट देऊन संबंधीत अधिकारी व लोकांबरोबर चर्चा
२. दैनिक सकाळ, पुढारी, जनप्रवास व इतर दैनिक अग्रलेखांचा अभ्यास.
३. महात्मा गांधीजीच्या विचारावरील पुस्तके, लेख, उदा. अर्थदर्शन – लेखक ज.फा.पाटील, २००६ पान नं. ८९
४. र.पु.कुरुलकर (औरंगाबाद) लेख अर्थासंवाद जून २००७, खंड ३१, अंक १ पान ७४